

# शिवगड अध्यात्म चॅरिटेबल ट्रस्ट

**श्रीकृष्णनगरी**

मु. पो. मुरगूड, ता. कागल, जि. कोल्हापूर.


ध्यक्ष : श्री. विक्रमसिंह जयसिंगराव घाटगे
चेअरमन, श्री छ. शाहू सहकारी साखर कारखाना लि., कागल

ाध्यक्ष : सौ. स्नेहा विद्याधर महाजन, पुणे

चिव : श्री. जोतिराम गोपाळराव सुर्यवंशी-पाटील, मुरगूड

जानिस : श्री. बाळासो मारुती सुर्यवंशी-पाटील, मुरगूड

इसचिव : श्री. बाळकृष्ण आनंदराव चौगले, कोल्हापूर

टी : श्री. समरजितसिंह विक्रमसिंह घाटगे


जावक नंबर Regi. No. 16/6/2011-E2490/KOP    दिनांक : 30/08/2012

आपल्या परिवारातील सर्वांना डॉ. श्रीकृष्ण देशमुखसाहेब माहीत आहेत. डॉक्टरसाहेबांनी आपल्या परिसरात ३० वर्षे रुग्णसेवा केलेली आहे. वाहनांचा व इतर साधनांचा अभाव अशा विविध अडचणींचा तो काळ होता. रुग्णाला ताबडतोब उपचार देणे हे त्यांच्या रुग्णसेवेचे वैशिष्टय होते. त्यांच्या या रुग्णसेवेचा आदर्श आजही जनसामान्यात बोलला जातो.

वैद्यकीय सेवा करत असतानाच डॉक्टर साहेबांनी विठ्ठल मंदिर, मुरगूड येथून ईश्वरीय सेवेस सुरुवात केली. प्रथम स्वत: माळ घालून सुशिक्षित लोकांना भक्तिमार्ग निर्भय करुन दिला. मुरगूडच्या कुंभार गल्ली विठ्ठल मंदिराचे व्यासपीठ मजबूत केले. परिणामी परिसरातील वारकरी संप्रदायाची घडण चांगल्या प्रकारे होत आहे.

डॉक्टर साहेबांनी आपल्या प्रवचनाव्दारे वारकरी संप्रदायाचे अध्यात्मिक तत्वज्ञान डोळसपणा वाढेल अशा प्रकारे प्रसारीत केले आहे. संप्रदायाची शास्त्रशुध्द बैठक डॉक्टर साहेबांनी घडवली आहे. दररोज शेकडो रुग्ण हजेरी लावणारा व मोठ्या भरभराटीने सुरु असणारा भरगच्च दवाखाना बंद करुन समाजाच्या आध्यात्मिक प्रबोधनाला डॉक्टर साहेबांनी वाहून घेतले आहे.

मुरगूडपासून सुरु असणारा हा अध्यात्मिक विचारांचा प्रसार जिल्हा–राज्य–देश–परदेश अशा सिमा पार केल्या आहेत. डॉक्टर साहेबांचे व्यक्तिमत्व आंतरराष्ट्रीय झाले आहे. मुरगूड व परिसराचे नांव डॉक्टर साहेबांच्यामुळे जगाच्या नकाशावर पोहोचत आहे.

डॉक्टर साहेबांचे कार्य पुढे चालू ठेवण्याकरीता व पुढील पिढ्यांना कळण्याकरीता शिवगड अध्यात्म ट्रस्ट, मुरगूड ही संस्था स्थापन करुन रजिस्टर केलेली आहे. डॉक्टर साहेबांच्या प्रवचनांच्या सी. डी. डॉक्टरसाहेबांची लिहिलेली असंख्य पुस्तके, संपादित केलेले ग्रंथ, विविध शेकडो मासिकात आलेले लेख, डॉक्टर साहेबांच्यावरील विविध पुस्तके, डॉक्टर साहेबांची हस्तलिखिते व अन्य दुर्मिळ ग्रंथसंपदा यांचे संवर्धन व प्रसार व अभ्यासार्थींना ते उपलब्ध करुन देणे हे ह्या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

खेड्यातील अशिक्षित ते शहरातील सुशिक्षित असा बराच मोठा भक्त व अभ्यासू शिष्य वर्ग निर्माण झाला आहे. डॉक्टर साहेबांच्या व्यापक कार्याचा गौरव म्हणूनच एक व्यापक व्यासपीठ उभारणेचा हा निर्णय आहे. वरील ट्रस्टव्दारे मुरगूड येथील पिराच्या माळावर तीन एकर क्षेत्रात 'श्रीकृष्णनगरी' उभारणेचा संकल्प केलेला आहे. सदर प्रकल्पात अध्यात्मिक ग्रंथालय, ध्यानमंदिर, प्रवचन हॉल, भक्तनिवास व डॉक्टरसाहेबांचा स्वतंत्र मार्गदर्शन कक्ष असे निर्माण कार्य नियोजलेले आहे. सदर कार्याला आपण तन–मन–धनाने सर्वतोपरी सहकार्य करावे, ही विनंती.